# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

दिनांक 06/12/2023 ( बुधवार )

---

### खुनाचा प्रयत्न

पो.स्टे. उमरेड – पो.स्टे. उमरेड अंतर्गत मंगरुळ फाट्याजवळ टिप्पर चालकानेच टिप्पर मालकाच्या मानेला कोणत्यातरी धारदार शस्त्राने मारुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

शब्बीर आरीफ शेख वय २८ वर्ष रा, आठवडी बाजार समोर पाचगाव ता, उमरेड मो,क्र,७४९९०३७१६५ यांचेकडे टिप्पर क्र, एम,एच ४० सि,एम, ४९०८ हा टिप्पर असून त्या टिप्परवर ड्रायव्हर म्हणून १ महीन्यापासून फारूख शेख रा. कावरापेठ उमरेड यास ठेवले होते, शब्बीर शेख यांचा टिप्पर हा मांगरूळ येथील बंटी भांगडीया यांचे स्टोन क्रशर वर रोज गिट्टी भरून पाचगाव येथे येणे जाणे करतो. दि. ५/१२/२३ रोजी गाडीचा हिशोब असल्याने शब्बीर शेख हे पाचगाव वरून मांगरूळ फाटा येथे आले व त्यांचे टिप्परचे डिझेल चेक केले ते कमी असल्याने शब्बीर शेख यांनी फारुख शेख यास डिझेलबाबत विचारणा केली असता आरोपीने काही उत्तर दिले नाही, शब्बीर शेख यांनी फारुख शेख यास "तु डिझेल काढले का?" असे विचारले असता आरोपीने चिडून 'मैने कोई चोरी नही की, मुझपर ईल्जाम मत लगावो" असे ओरडू लागला. तेव्हा शब्बीर शेख यांनी टिप्पर चालकास 'मै ठाणे मै जाकर रिपोर्ट देता हूॅ तू वहा बताना" असे म्हणून टिप्पर जवळ उभा होता तेव्हा आरोपी हा फिर्यादीचे मागून आला आणि शिवीगाळ करत आज तेरा गेम बजाता असे म्हणून कोणत्यातरी धारदार शस्त्राने फिर्यादीचे डावे बाजूचे मानेवर वार करून गंभीर दुखापत केली व जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला शब्बीर शेख यांचे बयाणावरून पोस्टे. उमरेड येथे कलम ३०७ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास म.स.पो.नि. सुचिता मंडवाले मो,क्र, ९७६३२३४५४८ पो,स्टे, उमरेड ह्या करीत आहेत.

# चोरी

पो.स्टे. रामटेक –

दि. ०५/१२/२३ रोजी सौ. पायल आशिष मोहारे वय २४ वर्ष रा. चिचाळा ता. रामटेक जि.नागपुर ही आपल्या बहीनीचे लग्ना करीता जि. भंडारा येथे जाण्याकरीता आज आपले मोठे वडीलांसोबत रामटेक बस स्टॉप वर आले होते. रामटेक बसस्टॉपवर भंडारा बस लागली होती बसमध्ये गर्दी असल्याने तीच्याकडील एक कपड्याची मोठी बॅग आपल्या मोठे वडीलांकडे दिली व लग्णात घालण्याकरीता घेतलेले सोन्याचे दागिने असलेली एक हॅन्ड बॅग घेवुन बसमध्ये जावुन सीटवर बसली काही वेळातच बस सुरू झाली व अंबाळा रामटेक जवळ पोहचली तेव्हा तीकीटचे पैसे काढण्याकरीता पर्स काढली व पाहीले असता त्यातील दागिने १) ०७ ग्राम सोन्याचा अंगठी किंमती २१,०००/रु. २) ४ ग्राम सोन्याची अंगठी कि. १२,०००/–रू. ३) चांदीचा कमरपटटा की.१०,०००/–रू. ४) दोन जोडी चांदीचे जोडळे कि. १,०००/–रू. ५) ३.५० ग्रॅम सोन्याचे कानातले झुंमके की. १०,५००/–रू. ६) ५ ग्रॅम सोन्याची नथ कि. १५,०००/–रू ७) ६ ग्रॅम वजनी सोन्याचे मंगळसुत्र ज्यात पी.टी. ओ. मनी लागलेले व पदक असलेले की. १८,०००/–रू. असे एकुण ८७,५००/–रूपये चे दागीने दिसले नाही. वरील दागीने कोणीतरी अज्ञात चोरानेच चोरले आहेत अशा सौ. पायल यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे अप क्र ९१३/२३ कलम ३७९ भा.दं.वि अन्वये गुन्हा नोंद असुन पुढील तपास पोहवा/९६१ गजानन माहुरे मो.न. ८७८८३१६१८२ हे करीत आहे.

## मोहाफुल दारुभट्टी कार्यवाही



पो.स्टे. केळवद –

नागपूर ग्रामिण जिल्हयातील पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील तिडंगी पारधी बेडा येथे काही इसम दि. ०५.१२.२०२३ रोजी अवैद्यरित्या मोहाफुलाची गावठी दारु गाळत असल्याची तक्रार प्राप्त झाल्याने नागपूर ग्रामिणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार यांनी केळवदचे ठाणेदार श्री. साखरकर यांचे नेतृत्वात विशेष पथक तयार करुन तिडंगी येथे धाड टाकुन मोहाफुल गावठी दारु गाळणाऱ्या इसमांवर कार्यवाहीचे आदेश दिले त्याप्रमाणे खालीलप्रमाणे कार्यवाही केली–

१. २४ निळ्या रंगाच्या ड्राम मध्ये प्रत्येकी २०० लिटर मोहाफुल रसायन सडवा असा एकुन ४८०० लिटर प्रती लिटर २०/–रुपये असा एकुन ९६,०००/–रुपये
२. १६० लिटर मोहाफुल गावठी दारु प्रती ५०/– लीटर प्रमाणे एकुण कीमंती ८,०००/– रुपये
३. १०० किलो ग्राम मोहाफुल प्रत्येकी ५०/– रुपये किलो अशा एकुण ५०००/– रुपये

४. २४ निळ्या रंगाच्या खाली ड्राम प्रत्येकी कीमती १०००/— रुपये प्रमाणे अशा एकुण किमंती २४,०००/— रुपये
५. ०४ नग लोंखडी ड्राम मध्ये उकळलेले रसायनने भरलेले प्रत्येकी १०० लिटर प्रमाणे ४०० लीटर, प्रती लिटर २०/— रुपये अशा एकुण ८,०००/—रुपये
६. ४ नग लोंखडी ड्राम  किमंती ४८००/— रुपये
७. २ टन जळाउ लाखुड प्रती टन ५०००/— रुपये
८. ईतर दारु गाळण्याचे साहीत्या पाईप जर्मन घमीला ईतर साहीत्या एकुण किमंती ८,०००/— रुपये अशा एकुण १,५८,८००/—रुपयाचा मुद्देमाल मिळुन आला.

घटनास्थळावरील मुद्देमाल मोहाफुलाची दारु व सडवा मोक्यावर नाश केले असुन इतर साहित्य जप्त केले आहे. गुन्हयातील दोन महिला आरोपींवर कलम ६५ (बी)(सी)(ई)(एफ) म. दा. का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामिणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार व अपर पोलीस अधिक्षक श्री. संदिप पखाले यांचे मार्गदर्शानात केळवद पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक श्री. साखरकर व त्यांच्या टिमनी पार पाडली.

# मोहाफुल दारुभट्टी कार्यवाही

पो.स्टे. जलालखेडा –

नागपूर ग्रामिण जिल्हयातील पोलीस स्टेशन जलालखेडा हद्दीतील उमठा येथे काही इसम दि. ०५.१२.२०२३ रोजी अवैद्यरित्या मोहाफुलाची गावठी दारु गाळत असल्याची तक्रार प्राप्त झाल्याने नागपूर ग्रामिणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार यांनी जलालखेडाचे ठाणेदार श्री. चव्हान यांचे नेतृत्वात विशेष पथक तयार करुन उमठा येथे धाड टाकुन मोहाफुल गावठी दारु गाळणाऱ्या इसमांवर कार्यवाहीचे आदेश दिले त्याप्रमाणे खालीलप्रमाणे कार्यवाही केली–

पाच पांढ–या रंगाच्या प्लास्टीक डबकी मध्ये २० लिटर क्षमतेच्या व एक पाच लिटर क्षमतेच्या पांढ–या प्लॅस्टीक डबकी मध्ये मोहाफुल  गावठी दारु ११० लिटर प्रत्येकी ५० लिटर प्रमाण ो ५५०० रु चा माल

१. ५० लिटर मोहाफुल गावठी दारु प्रति लिटर १०० प्रमाणे ५००० रु चा माल
२. एक खाकी रंगाच्या खर्डा मध्ये देशी दारुच्या सिल बंद ४८ निपा प्रत्येकी निप ची किमंत ८० रु एकुण किमंत ३८४० रु चा माल

असा एकुण १४३४०/– रुपयाचा मुद्देमाल पैकी मोहाफुलाची दारु मोक्यावर नाश करुन उर्वरीत माल जप्त करण्यात आला आहे. सदर कार्यवाहीमध्ये राजुसिंग नथुसिंग भोंड वय ५० वर्ष रा. आरंभीसह इतर दोन महिलांवर म.दा.का. अन्वये गुन्हे नोंद कला आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामिणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार व अपर पोलीस अधिक्षक श्री. संदिप पखाले यांचे मार्गदर्शानात जलालखेडा पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक श्री. चव्हाण व त्यांच्या टिमनी पार पाडली.

# मोहाफुल दारुभट्टी कार्यवाही



पो.स्टे. बुटीबोरी –

नागपूर ग्रामिण जिल्हयातील पोलीस स्टेशन बुटीबोरी हद्दीतील धवळपेठ येथे काही इसम दि. ०६.१२.२०२३ रोजी अवैद्यरित्या मोहाफुलाची गावठी दारु गाळत असल्याची तक्रार प्राप्त झाल्याने नागपूर ग्रामिणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार यांनी बुटीबोरीचे ठाणेदार श्री. भिमाजी पाटील यांचे नेतृत्वात विशेष पथक तयार करुन धवळपेठ येथे धाड टाकुन मोहाफुल गावठी दारु गाळणाऱ्या इसमांवर कार्यवाहीचे आदेश दिले. त्यानुसार 1) 4860 लिटर सडवा किंमती 97,200 रुपये 2) मोहा फुल गावठी दारू १३० लिटर किंमती ६५०० रुपये 3) इतर साहित्य ४१०० किमती रुपये असा एकूण 107,800 रूपये चा माल जप्त करण्यात आला आरोपीतावर म.दा.का. अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामिणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार व अपर पोलीस अधिक्षक श्री. संदिप पखाले यांचे मार्गदर्शानात बुटीबोरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. भिमाजी पाटील व त्यांच्या टिमनी पार पाडली.

# मोहाफुल दारुभट्टी कार्यवाही

पो.स्टे. जलालखेडा –

नागपूर ग्रामिण जिल्हयातील पोलीस स्टेशन जलालखेडा हद्दीतील उमठा येथे काही इसम दि. ०६.१२.२०२३ रोजी अवैद्यरित्या मोहाफुलाची गावठी दारु गाळत असल्याची तक्रार प्राप्त झाल्याने नागपूर ग्रामिणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार यांनी जलालखेडाचे ठाणेदार श्री. चव्हान यांचे नेतृत्वात विशेष पथक तयार करुन उमठा येथे धाड टाकुन मोहाफुल गावठी दारु गाळणाऱ्या इसमांवर कार्यवाहीचे आदेश दिले त्याप्रमाणे खालीलप्रमाणे कार्यवाही केली–

१. चार पांढऱ्या रंगाच्या प्लास्टिक डबक्यात प्रत्येकी २० लिटर क्षमतेचा मध्ये मोहाफुल गावठी दारू भरलेल्या एकूण ८० लिटर प्रत्येकी ५० रुपये लिटर प्रमाणे ४००० रुपयाचा रू चा माल
२. तीन पांढऱ्या रंगाच्या प्लास्टिक डबक्यात प्रत्येकी २० लिटर क्षमतेचा मध्ये मोहाफुल गावठी दारू भरलेल्या एकूण ६० लिटर प्रत्येकी ५० रुपये लिटर प्रमाणे ३००० .रु-
३. इंग्रजी दारू ओसी ब्लू कपंनीच्या प्रत्येक १८० मी ली च्या ०५ निपा प्रत्येकी किंमत १५० ₹ प्रमाणे ऐकून ७५० ₹

रॉयल स्टेज कपंनी च्या प्रत्येकि १८० एम एल च्या ३ निपा प्रत्येकि १८० ₹ एकून किंमत ५४० ₹ चा एकुण ८२९० ₹ चा चा माल जप्त करण्यात आला व आरोपी किसन अशोक पवार वय 28 वर्ष रा. उमठा ता. नरखेड जिल्हा नागपूर व जीवन भाऊसाहेब पवार वय ३५ वर्ष रा उमठा ता नरखेड जिल्हा नागपूर.दा.का. अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामिणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार व अपर पोलीस अधिक्षक श्री. संदिप पखाले यांचे मार्गदर्शानात जलालखेडा पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक श्री. चव्हाण व त्यांच्या टिमनी पार पाडली.

## मोहाफुल दारुभट्टी कार्यवाही

पो.स्टे. कुही –

नागपूर ग्रामिण जिल्हयातील पोलीस स्टेशन कुही हद्दीतील वडद पारधी बेड्यावर काही इसम अवैद्यरित्या मोहाफुलाची गावठी दारु गाळत असल्याची तक्रार प्राप्त झाल्याने नागपूर ग्रामिणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार यांनी कुहीचे ठाणेदार श्री. महेश भोरटेकर यांचे नेतृत्वात विशेष पथक तयार करुन वडद पारधी बेड्यावर धाड टाकुन मोहाफुल गावठी दारु गाळणाऱ्या इसमांवर कार्यवाहीचे आदेश दिले त्यावरुन दि. ६.१२.२०२३ रोजी कुही पोलीसांनी वडद पारधी बेड्यावर येथे धाड टाकली असता अवैद्यरित्या गावठी दारु काढणारे एक पुरुष व एक महिला आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले त्यांचेकडुन मोहाफुल सडवा रसायन ३००० लिटर बाजारभाव किंमत ६०००० रुपयाचा मद्देमाल जप्त करण्यात आला दोन्ही आरोपीतांविरुध्द पोलीस स्टेशन कुही येथे महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करुन कार्यवाही करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामिणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार व अपर पोलीस अधिक्षक श्री. संदिप पखाले यांचे मार्गदर्शानात कुही पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश भोरटेकर व त्यांच्या टिमनी पार पाडली.

# मोहाफुल दारुभट्टी कार्यवाही

पो.स्टे. देवलापार –

नागपूर ग्रामिण जिल्हयातील पोलीस स्टेशन देवलापार हद्दीतील चोरबावली येथे काही इसम दि. ०६.१२.२०२३ रोजी अवैद्यरित्या मोहाफुलाची गावठी दारु गाळत असल्याची तक्रार प्राप्त झाल्याने नागपूर ग्रामिणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार यांनी बुटीबोरीचे ठाणेदार श्री. राजेश पाटील यांचे नेतृत्वात विशेष पथक तयार करुन चोरबावली येथे धाड टाकुन मोहाफुल गावठी दारु गाळणाऱ्या इसमांवर कार्यवाहीचे आदेश दिले. त्यानुसार

१. ६० लिटर मोहाफुल गावठी दारु
२. १५० लिटर मोहाफुल सडवा व इतर साहित्य असा एकुण ८२५०/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला व आरोपीतांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामिणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार व अपर पोलीस अधिक्षक श्री. संदिप पखाले यांचे मार्गदर्शानात देवलापार पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. राजेश पाटील व त्यांच्या टिमनी पार पाडली.

# १३ वर्षाच्या बालकाला ३६ तासाच्या आत शोधण्यात नरखेड पोलीसांना यश

पो.स्टे. नरखेड – याबाबत सविस्तर वृत असे की,यातील तक्रारदार नामे सौ.नंदा प्रल्हाद सलामे वय ३५ वर्ष रा खरसोली ता नरखेड यांचा मुलगा नामे राहुल प्रल्हाद सलामे वय १३ वर्ष रा.खरसोली ता नरखेड याला दिनांक ०३/१२/२०२३ रोजी दुपारी ०३:०० वा दरम्यान कोणीतरी अज्ञात ईसमाने त्याचे अज्ञानपणाचे फायदा घेवून फुस लावून पळवून नेल्याचे तक्रारदार यांच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन नरखेड येथे दिनांक ०४/१२/२०२३ रोजी १९:१९ वा गुन्हा नोंद क्र ५१७/२०२३ कलम ३६३ भादवी प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभिर्य पाहता तपास त्वरीत सुरू करण्यात आला.दोन तपास पथक तयार करून तपासा दरम्यान नमुद गुन्हयातील मुलगा नामे राहुल प्रल्हाद सलामे वय १३ वर्ष हा आश्रम शाळेत जाण्याची त्याची ईच्छा नव्हती अशी माहिती समोर आल्याने त्या दृष्टीकोणातुन तपासचक्रे फिरवण्यात आले आणी कौशल्यपुर्ण व तांत्रिक तपास करून त्या मुलाला मेंडकी ता काटोल जि नागपूर याला गुन्हा दाखल झाल्याचे ३६ तासाच्या आत मेंडकी ता काटोल जि नागपूर येथुन शोधुन काढण्यात यश आले.

सदरची कार्यवाही ही मा.पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार, नागपूर जिल्हा ग्रामिण, अपर पोलीस अधिक्षक श्री. संदिप पखाले, नाग्रा, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. बापू रोहोम, काटोल विभाग काटोल यांचे मार्गदर्शनात सपोनि कृष्णा रा तिवारी ठाणेदार पोलीस स्टेशन नरखेड व स्टाफ पोहवा गजानन तितरे बन २०९७,पोहवा सुनिल कोकाटे बन ३७०, पोशी जालिंदर राठोड बन ११७०, पोशी अक्षय ठाकरे बन १४१ चापोहवा किशोर राठोड बन २०४७ पोलीस स्टेशन नरखेड यांनी केली.